**दि.०९.०३.२०२४**

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी अभिनव उपक्रम माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र धुळे येथे तीन दिवसीय किफायतशीर शेळीपालन या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न....**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे व सेवा सहयोग संस्था,पुणे यांचे माध्यमातून महिलांसाठी तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न. सदर प्रशिक्षण उदघाटन कार्यक्रम डॉ. दिनेश नांद्रे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, प्रा.श्रीधर देसले, उद्यान वेत्ता, विवीके, धुळे ,डॉ.महेश गणापुरे, श्री. जगदीश कथेपुरी,शास्त्रज्ञ,कृषि विद्या,कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, श्री.अनिल पाटील, अधिकारी, सेवा सहयोग संस्था, पुणे, श्री. पंकज राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ.धनराज चोधरी यांनी केले, प्रास्तविका मध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश सांगत, कृषी बरोबर कृषी पूरक व्यवसाय यामध्ये पशुसवंर्धन करत असताना महिलांचे योगदान कसे महत्वाचे आहे हे अधोरेखित करत शेळी पालनाचे महत्व याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.दिनेश नांद्रे, यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थे मधील शेलीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले तसेच जास्तीत जास्त महिला पशुपालाकांनी शेतकरी प्रशिक्षणा मध्ये सहभाग नोंदवत शेलीपालानातील शास्त्रीय बाबी समजून घेवून नियोजन करण्याचे आव्हान केले.

सदर तीन दिवसीय तांत्रिक चर्चा सत्रामध्य डॉ. महेश गणापुरे, डॉ.धनराज चोधरी, श्री.रोहित कडू, प्रा.अमृता राऊत, श्री. भाऊसाहेब देसले, यांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने शेळी पालन व्यवसायाची ओळख, शेळीपालन कशाकरिता, शेळीपालनाचे फायदे, भारतातील/महाराष्ट्रतील शेळयांच्या जाती व त्यांचे वैशिष्टे, शेळीपालनाच्या पद्धती, शेळयांच्या कारदांचे संगोपन व आहारव्यवस्थापन इत्यादी, शेळयांचे निगा, आहार व्यवस्थापन, नर निगा, आहार व्यवस्थापन, पशु पैदास धोरण, शेळयांची निगा लसीकरण व रोग व्यवस्थापन, दुध व मांस खरेदी विक्री व्यवस्थापण, विविध शासकीय योजना माहिती, प्रकल्प अहवाल तयार करावयाची माहिती, गट शेती संकल्पना व महत्व, इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर महिला प्रशिक्षणाचा समारोप डॉ.राहुल देसले, प्राचार्य, घटक कृषी तंत्र, विद्यालय, धुळे यांच्या प्रमुख उपस्तीतीमध्ये करण्यात आला. समारोपीय मार्गदर्शनात डॉ. राहुल देसले यांनी शेळी उत्पादनाचे सध्यस्थिती मधील महत्व अधोरेखित करत मार्गदर्शन केले.प्रशिक्षणामध्ये ग्रामीण महिला पशुपालक यांनी सहभाग नोंदवला. तसेच प्रशिक्षणा दरम्यान श्री.भाऊसाहेब देसले यांच्या शेळीपालन युनिट प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणाचे संचालन व आभार डॉ.धनराज चौधरी यांनी केले. प्रशिक्षण यशस्विते साठी डॉ.पंकज पाटील, डॉ.आतिश पाटील,,कु.प्राची काळे,श्री.स्वप्रील महाजन, श्री.बाळू वाघ, श्री.कुमार भोये, श्री.रमेश शिंदे, श्री. कुणाल राजळे, श्री. जीवन राणे इ. कृषी विज्ञान केद्र धुळे अधिकारी,कर्मचारी तसेच सेवा सहयोग संस्था, पुणे यांचे सहकार्य लाभले.